वार्षिक योजना १९९६-९७ वैधानिक विकास मंडळांना विशेष निधी.
पूर्व विभागाच्या [विदर्भ] कारागृह प्रशासनाच्या आधुनिकीकरणासाठी योजना.

महाराष्ट्र शासन.
गृह विभाग.
शासन निर्णय क्र. स्का[illegible]यपस-०१९६/८१६/पीआरएस-२
दिनांक-[illegible] फेब्रुवारी १९९७.

वाचा:- कारागृह महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अेक्यायपी-९६-९७ क्र-४, पुणे-१, दिनांक ६.१.१९९६.

निर्णय :- सन १९९६-९७ च्या वार्षिक योजनेमध्ये विदर्भ वैधानिक विकास मंडळाच्या विशेष निधीमधून पूर्व विभागातील कारागृहाशी संबंधित योजनेकरिता रु. ३४.२० लाखाचा अतिरिक्त निधी नियोजन विभागाने राखून ठेवलेला आहे. कारागृह महानिरीक्षक पुणे यांनी विदर्भ वैधानिक विकास मंडळासाठी राखून ठेवलेल्या नियत व्ययातुन पूर्वविभागातील कारागृहांशी संबंधीत योजनेकरिता खालील प्रस्तावास शासन या आदेशान्वये प्रशासकिय मान्यता देण्यात येत आहे. परंतु सदर प्रस्ताव नविन स्वरुपाचे असल्याने विधान मंडळाच्या नजरेस आणणे आवश्यक आहे. तसेच अर्थसंकल्पात पुरवणी मागण्यांद्वारे पुरेशी तरतूद केल्याशिवाय प्रत्यक्षात सदर यंत्र सामुग्री खरेदी करण्यात येऊ नये.

अ. क्र.	योजनेचे नांव	नागपूर विभाग.	अमरावती विभाग	एकूण प्रस्तावित तरतूद.
१.	२.	३.	४.	५.
१.	शेतीकामी जुन्या व निकामी झालेल्या ट्रॅक्टरच्या जागी एक नविन ट्रॅक्टर ट्रॉलीसह खरेदी करणे.	५.०० लाख	—	५.००
२.	प्रशिक्षणासाठी नविन व यंत्रमाग उद्योगाचे आधुनिकीकरणासाठी नविन यंत्रमाग आणि आधुनिक पध्दतीने पायरलूम खरेदी करणे.	५.००	३.००	८.००
३.	शेती विषयक मालाचे वाहतुकीकरिता पीकअप व्हॅन खरेदी [अकोला जिल्हा कारागृह]	—	५.००	५.००
४.	शेती उत्पादनाकरिता सबमर्सिबल पंप व ३ अश्वशक्तीचे मोटारपंप खरेदी करणे.	—	०.७०	०.७०
५.	पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे [यवतमाळ जिल्हा कारागृह]	—	०.५०	०.५०

लाख

२. कारागृह महानिरीक्षक [पुणे] यांना उपरोक्त साधन सामुग्री वैधानिक विकास मंडळाच्या विशेष निधीतून पूर्व विभागातील कारागृहासाठी राखून ठेवलेल्या ३४.२० लाख एवढया निधीमधून खरेदी करण्यास या आदेशाव्दारे परवानगी देण्यात येत आहे.

३. सदरचा खर्च १९९६-९७ या वित्तिय वर्षात वैधानिक विकास मंडळाच्या विशेष निधीतून मंजूर झालेल्या तरतुदीतून भागविण्यात यावा. सदर यंत्र सामुग्री खरेदीसाठी येणारा खर्च रु. १९,२०,०००/-[रु. एकोणीस लाख वीस हजार] एवढा मागणी क्रमांक" २०५६ तुरुंग-१०१[सहा] कारागृह उद्योगाच्या विकास [२०५६००६२]३२ यंत्रसामुग्री व साधन सामुग्री या शिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. हा आदेश नियोजन विभाग व वित्त विभागाच्या सहमतीने अनुक्रमे अनौपचारीक संदर्भ क्र. २२० अनौ/१४५२/दिनांक २७.९.९६ व क्र. ६५/९७/व्यय-८ दिनांक ३०.१.९७ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

[श्री. य. सोनवणे]
अवर सचिव, महाराष्ट्रशासन, गृह विभाग.

प्रति,

कारागृह महानिरीक्षक, पुणे.
कारागृह उपमहानिरीक्षक पूर्व विभाग, नागपूर.
महालेखापाल-१ [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्रराज्य, मुंबई.
महालेखापाल-१ [लेखा परीक्षा]महाराष्ट्र राज्य, मुंबई
जिल्हा कोषागार अधिकारी नागपूर/अमरावती/अकोला/यवतमाळ.
वित्त विभाग-व्यय-८
नियोजन विभाग. -१४५२
निवड नस्ती[पीआरएस-२.]